नि.फौ.ख.क्र. १२५/२०२५
सरकार वि. शैलेंद्र
नि.क्र.१८.

सरकारतर्फे **साक्षदार क्रमांक १** यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि

| | |
|---|---|
| **नाव** | **- गौतम महादेवराव पानतावने,** |
| वय | - ४१ वर्ष, व्यवसाय – शेती. |
| राहणार | - चाचेर, ता. मौदा, जि. नागपूर. |

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्री. एस. जी. इंगळे यांच्यामार्फत -**

**१.** दिनांक २३.०४.२०२५ रोजी पोलीसांनी मला पंचनामाकरीता समंस देऊन अरोली येथील गजभिये व पानतावनेच्या घराच्या मधल्या सिमेंट रोडवर बोलविले होते. आता मला समंस दाखवण्यात आला. त्यावर माझी सही अनुक्रमांक १ वर आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर समंसला **निशाणी क्र.१९** देण्यात येत आहे.

**२.** घटनास्थळी गेल्यानंतर माझ्यासोबत पोलीस, रवी बेलेकर, दुसरा पंच गणपत वाघमारे व इतर दोघेजण होते. घटनास्थळ पंचनामा दुपारी ०४.०० - ०४.३० वाजता सुरू होऊन ०५.०० - ०५.३० वाजता खतम झाला. घटनास्थळ हे सिमेंटचा पक्का रोड असून त्यावर वाहतूक असते. त्यानंतर घटनास्थळ पंचनाम्यावर मी व गणपत वाघमारे यांनी सही केली. सदर घटनास्थळ पंचनाम्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर घटनास्थळ पंचनामाला **निशाणी क्र.२०** देण्यात येत आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपींचे विद्वान वकिल श्री. ए. एस. रेवतकर यांच्यामार्फत –**

**३.** फिर्यादी माझी कोणीच लागत नाही. चाचेर ते अरोली मध्ये १० – १५ कि.मी.चे अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला पंचनाम्याकरिता हजर राहण्यास समंस चाचेरला आणून दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्याच दिवशी मी घटनास्थळी पोहोचलो. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, पहिल्या दिवशी नोटीस दिला होता व दुसऱ्या दिवशी घटनास्थळी गेलो होतो. आता मला निशाणी क्र.१९ वरील समंस दाखविण्यात आला. साक्षीदार सांगतो की, त्यामध्ये कुठे बोलविले, कुठे हजर रहायचे आहे हे नमूद नाही.

**४.** हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी पंचनामा आधीच लिहून ठेवला होता व त्यानंतर मी त्यावर सही केली. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, आम्ही हजर असताना पंचनामा लिहिला.

मला लिहिता वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी पंचनामा लिहिल्यानंतर तो मी वाचला नव्हता. आता मला निशाणी क्र.२० वरील घटनास्थळ पंचनामा दाखविला. साक्षीदार सांगतो की, त्यामध्ये पान क्र.२ वरील लाईन क्रमांक २ मध्ये दिनांक २३.०४.२०२५ रोजी पंचनामा तयार केल्याची तारीख नमूद आहे.

**५.** हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयात आल्यानंतर मी पंचनामा वाचला. हे म्हणणे खरे आहे की, दुसरा पंच गणपत वाघमारे हे आरोपीचे मामा आहे. हे मला माहिती नाही की, गणपतचे व आरोपीचे पटते किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचा पती रवींद्र बेलेकर याच्यासोबत मी कामाला जातो. रवींद्रसोबत मी ३ ते ४ वर्षांपासून काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, रवींद्रच्या सांगण्यावरून मी घटनास्थळ पंचनाम्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला पंचनामा माझ्या समक्ष तयार केला नव्हता व तशी घटना घडली नव्हती.

**उलटतपास संपला.**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत. समक्ष,

मौदा. Sd/-
दिनांक : १६.०४.२०२६ **(एन.के. वानखडे)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, मौदा